महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
अमरावती शहर पोलीस

**प्रेस नोट**
*गुन्हेशाखा युनिट क्र. २, अमरावती शहर.*
*पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती महाराष्ट्र राज्य*
*इ मेल आयडी :-crimebranch.cpamt@mahapolice.gov.in*
*फोन क्र ०७२१-२५५०१८१*

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

# विशेष प्रेस नोट

दि. १५/०१/२०२५

मा. श्री. नविनचंद्र रेडडी, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक 15.01.2025 रोजी नागरीकांसाठी विशेष तक्रार निवारण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

पोलीस आयुक्तालय परिसरातील बरेच तक्रारदार हे त्यांचे तक्रारी हे पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर येथे व त्यांचे अधिनस्थ कार्यरत असलेल्या पोलीस स्टेशन व इतर शाखेत देत असतात. सदरचे तक्रारदार हे त्यांचे तक्रारी हे पोलीस आयुक्त या कार्यालयासोबत इतर वरिष्ठ कार्यालयामध्ये त्यांच्या तक्रारी हया प्रत्यक्ष अथवा पोष्ठाव्दारे पाठवित असतात.

दिनांक 13.01.2025 ते 16.01.2025 या दरम्यान वसंत हॉल येथे तक्रारदार यांचे तक्रार निराकरण करण्याकरीता विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेमध्ये पोलीस आयुक्तालयातील तक्रारींची चौकशी करणारे मा. पोलीस आयुक्त नविनचंद्र रेडडी सो. पोलीस उपायुक्त परिमंडळ 1 व 2 व सर्व सहायक पोलीस आयुक्त व सर्व अधिकारी व अंमलदार तसेच बरेच तक्रारदार हे हजर होते. आजच्या विशेष कार्यशाळेमध्ये **आयुक्तालयातील एकूण** ८६० प्रलंबित अर्ज निकाली काढण्यात आले असून तक्रारदारांचे सामोपचाराने व कायदेशीर प्रक्रियेव्दारे निराकरण करण्यात आले आहे. याव्दारे असेही नमूद करण्यात येते की, पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर व्दारे दिनांक 16.01.2025 रोजी वसंत हॉल येथे तक्रारदारांचे निराकरण करण्याकरीता कार्यशाळा आयोजित केले असून नागरीकांनी स्वत:चे आधी केलेल्या तक्रारीबाबत जास्तीत जास्त संख्येने वसंत हॉल येथे उपरोक्त दिनांकास उपस्थित राहावे. हि विनंती.

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर**